बृहन्महाराष्ट्र वृत्त
बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web:
www.bmmonline.org

उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मे २००७
वर्ष २७, अंक ५

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

सिॲटल अधिवेशन आता महिन्यावर येऊन ठेपले असून नांव नोंदणीला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. सिॲटलच्या स्वयंसेवकांनी गेली दोन वर्षे अविश्रांत मेहेनत घेऊन आकर्षक कार्यक्रम आंखल्याने अधिवेशन सर्वांना आवडेल याची मला खात्री आहे. या मोठ्या कार्यात कोणतीही उणीव राहू नये म्हणून सर्वजण प्रयत्नशील आहेत.

- सर्व प्रमुख पाहुणे, वक्ते व कलाकार यांच्या प्रवासाची तयारी पूर्ण झाली असून सर्वांचा व्हिसा मंजूर झाला आहे (श्री. प्रकाश आमटे यांचा सुद्धा) हे मला येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.
- चांदणी बार, कार्पोरेट, पेज ३, ट्रॅफिक सिग्नल अशा सामाजिक विषयांवरील चित्रपटाचे निर्माते मधुर भांडारकर यांनी अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे.
- फूड कमिटीने अत्यंत चवदार अशा मराठी जेवणाचा मेनू खास आपल्यासाठी तयार केला आहे.

अजूनही ज्यांनी नांवनोंदणी केली नसेल त्यांनी ती कृपया लवकर करावी ही विनंती.

१२ व १३ मे रोजी शिकागो येथे एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी झाली. या फेरीत उत्तर अमेरिकेतील ५ विभागातून विजयी झालेल्या पहिल्या दोन क्रमांकाच्या एकांकिका अशा एकूण १० एकांकिका सादर कण्यात आल्या. सर्वच एकांकिकांचा कलात्मक दर्जा उत्तम होता. स्पर्धेचा निकाल पान ९ वर दिला आहे. प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या एकांकिका सिॲटल अधिवेशनात सादर होतील. सर्व विजेत्यांचे अभिनंदन. बृ. मंडळाने यंदा हा नविन उपक्रम हाती घेतला. त्याला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

बृ. मंडळाच्या कार्यात आणखी मदत होण्यास ३ जणांचे सल्लागार मंडळ नेमल्याचे गेल्या महिन्यात जाहीर केले होते. त्या तिघांनी ही जबाबदारी स्विकारली असून त्यांनी स्वयंसेवक निवडण्यास व विविध स्वरूपाच्या समित्या स्थापन करण्यास सुरूवात केली आहे. आपणाला एख़ाद्या समितीवर काम करायची इच्छा असल्यास मला ई मेल पाठवा.

बृ. मंडळाच्या प्रथेप्रमाणे सिॲटल अधिवेशनातसुद्धा विशेष कामगिरी बजावलेल्या उत्तर अमेरिकेतील मराठी व्यक्तींना पुरस्कार दिले जातील. त्या बद्दलची माहिती या पानावर पुनः दिली आहे. विविध क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या व्यक्ती व मराठी संस्थांची या पुरस्कारासाठी आपण नावे सुचवावीत अशी विनंती. सुचविलेल्या नावातून प्राथमिक निवड करण्यासाठी एक स्वतंत्र कमिटी नेमण्यात आली असून अंतिम निवड बृ. मंडळाची कार्यकारिणी करेल.

आपल्या सूचना अथवा प्रतिक्रिया मला ई मेलने कळवा.

कळावे लोभ असावा ही विनंती

**जगदीश वासुदेव**
**अध्यक्ष, बृ. मंडळ उत्तर अमेरिका**
***president@bmmonline.org***

## BMM Awards 2007

BMM would like to recognize outstanding service of Maharashtrian individuals and Maharashtrian organizations by giving them achievement awards during BMM 2007 Convention in Seattle. Following are the criteria for the Awards:

(a) A nominee must be a resident of North America (U.S.A. & Canada) (In 1989 and in 1991 there were awardees from other countries – Brazil, India and so on.)

(b) Nomination may be forwarded either through the Mandal which is a member of BMM in good standing, meaning the Mandal must have paid dues prior to sending the nomination or through the members of the Executive committee of BMM

(c) One award will be given in each of the following categories based on outstanding achievements:

(i) Authors who published books (Marathi preferred, but not necessary)
(ii) Artists with achievement
(iii) Social Worker
(iv) Community workers in North America (Marathi schools, cultural event organizers, editors and authors of periodicals of Mandals including BMM etc.)
(v) Scientist
(vi) Industrialists/Businessman
(vii) Youth with special achievement
(viii) Marathi Organization or company

(Continued on Page 9)

## या अंकात ......

| | |
|---|---|
| तुम्ही अधिवेशनाला का जाता | २ |
| डॉ. जब्बार पटेल | ३ |
| मंडळांतून फेरफटका... | ४ |
| सिॲटल अधिवेशन | ५ |
| वेगळे काहीतरी | ६ |
| मराठी बाणा | ७ |
| आंब्याची निर्यात | ८ |
| एकांकिका स्पर्धा | ९ |
| डॉ. प्रकाश व मंदा आमटे | १० |
| शेवटचे पान | ११ |

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक

कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

संपादक मंडळ

मोहन रानडे, विद्या हर्डीकर सप्रे, मधुवंती भाट

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-800-300-6430
E-mail: editorbmm@yahoo.com

मुद्रक आणि वितरक

दिलीप नामजोशी
Sir Speedy Printing, Blue Bell, PA

वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक | $21 | $31 | $41 |
| द्वैवार्षिक | $40 | $60 | $80 |
| आजीव | $250 | $375 | $375 |

जाहीरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान | $155 | $220 |
| अर्धे पान | $85 | $115 |
| पाव पान | $50 | $70 |
| अष्टमांश पान | $35 | $45 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिद्ध होते
- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि बदलाचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ई मेल कळविल्यास दिली जाईल
- साहित्य परत पाठवले जात नाही (पोस्टेज पाठवलेत तरी)

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकरिणी
(२००५-२००७)

अध्यक्षः जगदीश वासुदेव, प्रिन्सटन्, न्यू जर्सी
कार्यवाहः कल्पना निमकर, कान्सास सिटी,
कोषाध्यक्षः गिरीश ठकार, पिटस्बर्ग,
सभासदः जगन्नाथ वाणी , कॅलगरी, कॅनडा
माणिक राणे, सिॲटल, वॉशिंग्टन
आशिष चौघुले, होकेसिन, डेलावेअर
किरण जोगळेकर, फिलाडेलफिया
नीला इनामदार, न्यू यॉर्क
माजी अध्यक्षः श्री ठाणेदार, सेंट लुईस
MAIYTRA मैत्र प्रतिनिधीः
लक्ष्मी भार्गवे, शिकागो
lakshmib.maiytra@gmail.com

प्रकाशक

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
26 Rocky Hill Road, Princeton, NJ 08540
jvasudev15@yahoo.com
www.bmmonline.org


# तुम्ही अधिवेशनास का जाता?

## वारी बीएम्‌एमची

मी बी एम् एमला का जाते
माझे मलाच न समजते
दर दोन वर्षांनी यात्रा भरते
कुठली ही देवी तिला का मी शरण जाते
स्वैच्छेने रेजिस्ट्रेशन फॉर्म भरते
हॉटेलात खोली बुक करते
एखाद्या वर्षी मैत्रिणिकडे उतरते
पण जाणार हे नक्की ठरवते
हातात वही बोटात पेन अडकवते
पटपट नोटस घेताना दिसते
आजूबाजूची कुजबुज ऐकते
'ही विचित्र  बाई कोण' त्यांची नजर म्हणते
कोणी हळुच तर कोणी मोठ्यानी विचारते
एखाद दुसरी कुत्सितपणे बोलते
केवढे प्रश्न करतात मला ते
मी मात्र आलतू फालतु उत्तरानी टरकावते
परत आपल्या वहीत मस्तक टेकते
उगाच् लिहिण्याचा आव आणते
अर्थात
स्वतःलाच फसवत असते
कारण कणभरात आपल्यात व्यस्त होतात ते
अशी मी दर दुसऱ्या वर्षी वारी करते
परत परत कन्व्हेंशन देवीला आळवते
पुन्हा एकदा बी एम् एम् भवानीला नमन करते
परत एकदा ह्या देवीच्या पाया पडते

**लतिका मंगरूळकर**

(Since I often tread where angels fear, am attaching a poem about why I bother to go to the BMM Convention. Less than middle school of Marathi education does not qualify me as a writer of any skill, but it was written in the spirit of participation.) ***latikamangrulkar@yahoo.com***

## पूर्वीच्या अधिवेशनातील निमंत्रित वक्ते

| | |
|---|---|
| १९८४ | शिकागो – द. मा. मिरासदार |
| १९८५ | टोरांटो – ना. ग. गोरे |
| १९८७ | न्यू जर्सी – पु. ल. देशपांडे |
| १९८९ | डेट्रॉईट – व. पु. काळे |
| १९९१ | लॉस एंजेलिस – शिवाजीराव भोसले |
| १९९३ | वॉशिंग्टन – विजया मेहता |
| १९९५ | ह्यूस्टन – गंगाधर गाडगीळ |
| १९९७ | बॉस्टन – लता मंगेशकर |
| १९९९ | सॅन होजे – डॉ. जयंत नारळीकर |
| २००१ | कॅलगरी – डॉ. अभय बंग |
| २००३ | न्यू यॉर्क – विजय तेंडुलकर |
| २००५ | ॲटलांटा – डॉ. रघुनाथ माशेळकर |

# अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे डॉ. जब्बार पटेल

-श्रीनिवास माटे

*डॉ. जब्बार पटेल यांना सिॲटल अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे. त्याबद्दल त्यांचा परिचय.*




मोठ्या माणसाचं एक लक्षण असे सांगता येईल की समोर असलेल्या माणसाला तो आपले मोठेपण भासवू देत नाही. पद्मश्री जब्बार पटेल यांच्या बाबतीत हे अगदी खरे आहे. त्यांची सर्व बिरुदावली लावायची म्हंटले तर त्यांचे नांव एखाद्या दाक्षिणात्य भारतीयापेक्षाहि मोठे होईल. कारण ते आहेत पद्मश्री, डॉक्टर, निर्माता, डिरेक्टर, अभिनेता, जब्बार पटेल. याशिवाय त्यांच्या शिरपेचात अनेक मानाचे तुरे आहेत. परंतु जब्बार पटेल यांच्याशी गप्पा करतांना त्यांच्या मोठेपणाचा दाब कधीच येत नाही.

याला जी कारणं आहेत त्यातील एक आहे त्यांच्या बोलण्यांतील मोकळेपणा आणि समोरच्या व्यक्तीशी दिलखुलास चर्चा करण्याची हातोटी. त्यांच्या आवाजांत नाट्य आहे, पण कृत्रिमता नाही; आर्जव आणि आपुलकी आहे, पण मनघरणी नाही. माणसं जोडणं आणि आपल्या ज्ञानकोशांत विविध विषयांवर माहिती गोळा करणं या त्यांच्या छंदामुळे बोलताना ते तुमचे लक्ष वेधून ठेवतात आणि संभाषणात तुम्हाला सहभागी करतांना 'बरं का, श्रीनिवास, त्याचं काय आहे' किंवा 'ती एक गंमतच आहे' असे सहज शब्दप्रयोग करतात. नर्म विनोद करणं, दुसऱ्याच्या विनोदाला मनापासून हंसून दाद देणं हा त्यांचा आणखी एक स्वभावविशेष. त्यांच्या या गुणांचे श्रेय जब्बार त्यांचे सोलापुरातील शिक्षक श्रीराम पुजारी यांना देतात. जवाहरलाल नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्याबद्दल आणि कॉंग्रेसच्या तेव्हाच्या सर्वसमावेशक विचारसरणीबद्दल आदर असलेल्या वडिलांकडून पण हा वारसा जब्बारनी घेतला आहे. त्यांची टिपकागदासारखी निरीक्षणशक्तीहि याला कारण आहे. राष्ट्राध्यक्ष अब्दुल कलाम यांच्या वडिलांची जशी रामेश्वर देवालयाच्या पुजाऱ्याशी मैत्री होती, तशीच जब्बारचे वडील रझाक पटेल यांची पुजारी कुटुंबाशी होती. वडील दौंडहुन सोलापूरला परत येईपर्यंत जब्बार पुजारी कुटुंबातच राहत होता. जब्बारच्या आजीने घरी आलेल्या ब्राह्मणाचा खाऊ पिऊ घालून सत्कार केला होता. त्याबद्दल जब्बार म्हणतात, 'प्रत्येकाला एक गोष्ट कळत होती, या देशात राहणारे लोक आहेत ते सगळे सारखे आहेत.' पुजारी सरांमुळेच त्यांच्या घरी बापट, पाडगांवकरांसारखे कवि आणि भीमसेन, कुमार गंधर्वांसारखे गायक यांचा परिचय होऊन जब्बारची त्या विषयांतील समज वाढीला लागली. तसेच मंगळवेढेकर सरांमुळे इंग्रजी अभिजात साहित्याची ओळख झाली.

पुण्याला बी.जे. मेडिकलला प्रवेश घेतल्यावर जब्बारनी एकीकडे शाळेत सुरू झालेला नाटकाचा छंद जोपासायला सुरुवात केली. त्यांचे कॉलेजमधील नाटकांतील काम पाहून भालबा केळकरांनी त्याना प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोशिएशन मध्ये बोलावले. 'तू वेडा कुंभार', 'खून पहावा करून', 'अशी पाखरे येती' अशा नाटकांतून त्यांनी कामें केली. या नाटकांना मिळालेल्या यशामुळे जब्बार एक उत्तम नट म्हणून पुढे आले. त्यांच्या अभिनयांत एक सहजता असल्याने ते अभिनय करीत आहेत असे वाटत नसे. डॉक्टर झाल्यावर जब्बारनी दौंडला प्रॅक्टीस सुरु केली. तेथील कामाची वाढती जबाबदारी डॉ. सौ. मणीबेन पटेल यांनी अंगावर घेतली. 'तू वेडा कुंभार'मध्ये जब्बारबरोबर शैला भाटेने (नंतरची माटे) छोटे काम केले होते. ती नवखी असूनहि जब्बारने तिला तसे भासूं दिले नव्हते. उलट "तुझे डोळे स्पॉटलाईटमध्ये चमकतात बरं कां" म्हणून हंसवले होते. तेंडुलकरांच्या 'घाशिराम कोतवाल' नाटकाला भालबांचा विरोध होता. त्यामुळे जब्बार, डॉक्टर लागू, मोहन आगाशे पी.डि.ए.मधून बाहेर पडले आणि त्यांनी 'थिएटर अकादमी' ही संस्था स्थापन केली. तेंडुलकरांचा आग्रह असूनहि दौंडमधील कामामुळे जब्बारनी स्वतः त्यात काम करायच्याऐवजी 'घाशिराम'चे फक्त दिग्दर्शन करायचे ठरवले. हे नाटक यूरोप आणि अमेरिकेतहि गाजले. पॅरिसच्या प्रयोगाबद्दल जब्बारना फ्रेंच लोक म्हणाले होते, "तुम्हाला आमच्या राजकारणातील मेख कशी समजली?!"

त्यानंतर जब्बारनी पुलंचे "तीन पैशाचा तमाशा" आणि अरुण साधूंचे "पडघम" ही नाटके दिग्दर्शित केली. सन १९७८ मध्ये संगीत नाटक अकादमीने जब्बार पटेलांना त्यांच्या रंगभूमीवरील कार्याबद्दल सन्मान देऊन गौरव केला. याच सुमारास डॉक्टरनी चित्रपट क्षेत्रांत प्रवेश केला. त्यांचे "सामना", "जैत रे जैत", "सिंहासन", आणि "उंबरठा" असे एकाहून एक सुंदर चित्रपट अनेक पुरस्कार घेऊन गेले. त्यानंतरचे "एक होता विदूषक", "मुक्ता" आणि हिंदी "मुसाफिर" हे त्यांचे चित्रपट सुद्धा गाजले. एक होता विदूषक हा विषय पुलंना जब्बारनी बोलता बोलता सुचवला होता. त्यांच्या चित्रपटांना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर तर पुरस्कार मिळालेच, शिवाय ते आंतरराष्ट्रीय महोत्सवातूनहि जगांत ठिकठिकाणी दाखवले गेले आहेत. पुलंपासून शरदराव पवारांपर्यंत अनेकांच्या मुलाखती जब्बारनी घेतल्या आहेत. चित्रपटांत स्वत: काम करण्याविषयी ते म्हणतात कीं, कॅमेऱ्याच्या पुढे आणि मागे अशी दोन्ही कामे सारख्याच तोलाने करणारी –राजकपूर, गुरुदत्त सारखी- माणसं विरळा असतात. त्यांच्या 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या नऊ भाषांत प्रसारित झालेल्या (एपिक) महाचित्रपटाला सर्वोत्तम नट,

*(पान ५ पहा)*

# मराठी मंडळातून फेरफटका

## सिध्दयोगावरील प्रवचने

परम पूज्य योगीराज श्री. नारायणकाका ढेकणे महाराज (काका महाराज) हे ऑगस्ट ते ऑक्टोबर २००७ या काळात अमेरिकेचा दौरा करणार असून त्यांची विविध शहरात सिध्द योगावर प्रवचने योजली आहेत. श्री. नारायण महाराज हे परम पूज्य श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज (ज्यांनी परम पूज्य श्री. गुळवणी महाराज यांना दीक्षा दिली) यांचे शिष्य आहेत.

श्री. नारायण महाराज मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषेत प्रवचने देतात. ज्यांना श्री नारायण महाराज यांची प्रवचने आयोजित करावयाची असतील त्यांनी अंजली मोने (न्यू यॉर्क) 631-269-9380 av.mone@gmail.com अथवा सुनील ललवानी (व्हर्जिनिया) (703)-723-7936 slalwani71@yahoo.com यांचेशी संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी:www.kunadalinishaktipatayoga.net

अंजली मोने
av.mone@gmail.com

## फ्रान्स महाराष्ट्र मंडळाची स्थापना

पॅरिस येथे १३ मे रोजी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस्. कुलकर्णी यांच्या हस्ते फ्रान्स महाराष्ट्र मंडळाची स्थापना झाली. गेल्या कांही वर्षापर्यंत फ्रान्समधे मराठी लोकांची संख्या अगदी कमी होती. परंतु भारत-फ्रान्स सहकार्यामुळे महाराष्ट्रातून अनेक तरूण फ्रान्समधे येऊ लागले. भविष्यात हा ओघ आणखी वाढेल. या लोकांना एकत्र येण्यास एक व्यासपीठ म्हणून महाराष्ट्र मंडळ स्थापन करण्याचे ठरले. उद्घाटनाचा कार्यक्रम म्हणून निवेदिका विनिता आपटे यांनी श्री. कुलकर्णी यांची मुलाखत घेतली. भारतीय दूतावासातील व 'युनेस्को'चे अधिकारी यावेळी उपस्थित होते. पुढील वर्षी पॅरिस येथे युरोपिय मराठी संमेलन भरविण्याचा विचार आहे त्या दृष्टीने फ्रान्स महाराष्ट्र मंडळाची स्थापना हे पहिले पाउल आहे असे मंडळाचे कार्यकारी संचालक राजेंद्र शेंडे म्हणाले. चंद्रशेखर राजगुरू हे मंडळाचे अध्यक्ष, शशिकांत धर्माधिकारी सचिव व गिरिश धर्मापुरीकर कोशाध्यक्ष आहेत.

## डॉ. मीना नेरूरकर यांचे नविन पुस्तक

अनुबंध प्रकाशन संस्थेने डॉ. मीना नेरूरकर यांच्या 'ठसे माणसांचे' या नविन पुस्तकाचे प्रकाशन पुण्यात प्रसिद्ध लेखक ह. मो. मराठे यांच्या हस्ते केले. त्यावेळी प्रा. मिलिंद जोशी यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सुधीर गाडगीळ यांनी डॉ. नेरूरकर यांची मुलाखत घेतली.

डॉ. मीना नेरूरकरांचे या आधीचे पुस्तक 'धन्य ते गायनॅक कळा' याला मराठी ग्रंथ संग्रहालयाचा आत्मचरित्र विभागाचा गेल्या वर्षीचा पुरस्कार मिळाला. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरूण साधू यांचे हस्ते हा पुरस्कार ८ मे रोजी प्रदान करण्यात आला.

## लंडन महाराष्ट्र मंडळाचा अमृतमहोत्सव

दिनांक १ व २ सप्टेंबर रोजी लंडन महाराष्ट्र मंडळाचा अमृतमहोत्सव साजरा होत असून दोन दिवसांच्या कार्यक्रमात स्थानिक कलाकारांबरोबर शौनक अभिषेकी, राहुल देशपांडे, सलिल कुलकर्णी हे महाराष्ट्रातील कलाकार भाग घेतील. अधिक माहितीसाठी www.mmlondon.co.uk या वेबसाईटला भेट द्या.




तुम्ही घर घ्यायचं आणि निर्धास्त व्हायचं.

मायदेशात घर घेताना तुमच्या डोळ्यासमोर असलेली असंख्य स्वप्नं, कुठल्याही काळजीचं ग्रहण न लागता पुरी होणारच याची आता खात्री बाळगा. अगदी घराच्या निवडीपासून देखभालीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आम्ही तुमच्या साथीला आहोत. उत्तमोत्तम डीएसके प्रकल्पातून मनाजोगतं घर निवडायला तुम्हाला योग्य मार्गदर्शन तर मिळेलच. शिवाय तुम्ही नसताना तुमच्या घराची संपूर्ण देखभाल आम्ही करू. भाड्याने द्यायची किंवा पुन्हा विकायची इच्छा असेल तर मदत आणि नियमितपणे कर भरण्याची व्यवस्थाही करू. तेव्हा तुमच्या सर्व चिंता काळज्यांचं ओझं आमच्यावर सोपवा आणि निर्धास्तपणे आनंद लुटायला सज्ज व्हा !

सर्वोत्तम लोकेशन्स, सर्वगुणसंपन्न घरं

• डीएसके **गार्डन एन्क्लेव्ह**, कोंढवा, पुणे • डीएसके **सुंदरबन**, हडपसर, पुणे • डीएसके **फ्रँजिपनी**, कँप, पुणे

DSK घराला घरपण देणारी माणसं®

डी.एस.कुलकर्णी डेव्हलपर्स लि.

AN ISO-9001, 14001, OHSAS 18001 COMPANY

डीएसके हाऊस, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे 411 005. फोन : 6604 7100 टेलि-इन्फोसाठी : 020 - 6604 7181
१४, उपासना, एल जे रोड, सेनाभवन जवळ, शिवाजी पार्क, मुंबई 400 016. फोन : 022 - 2432 4328
• E-mail: sales@dskdl.com • Web Site: www.dskdl.com

pratisaad.com 06/772

*(पान ३ वरून)*
दिग्दर्शक व कलादिग्दर्शन याबद्दल पुरस्कार मिळाले. ह्या चित्रपटाचे अमेरिकेत वितरण होण्याची शक्यता अजमावण्यासाठी लॉस एंजेलिसच्या ट्वेंटीएथ सेंचुरी फॉक्स स्टुडिऑत श्री. रूपर्ट मर्डॉक याना तो दाखवण्यात आला तेव्हा जब्बारनी भारतीय वकिलातीमधील श्री. अभ्यंकरांबरोबर मला अन् शैलालाहि बोलावले होते. तो पाहताना चित्रपटाच्या भव्यतेमुळे, अभिनयामुळे आणि जागोजाग जाणवणाऱ्या दिग्दर्शकाच्या कौशल्यामुळे आम्ही दोघेच नव्हे तर सर्वच भारून गेलो होतो. जब्बारचे वैशिष्ट्य असे की प्रत्येक चित्रपटात वेगवेगळे सामाजिक प्रश्न त्यांनी फार ताकदीने हाताळले आहेत. त्यानंतर जब्बारनी 'पु. ल. देशपांडे', 'प्रवासी पक्षी' (कुसुमाग्रजांवर), 'हंस अकेला' (कुमार गंधर्व) असे माहितीपट तयार केले असून सध्या ते महात्मा फुले यांच्यावर महाचित्रपट काढीत आहेत. शिवाय ते पं. शिवकुमार शर्मा यांच्यावरील माहितीपट पुरा करीत आहेत.

भारताच्या राष्ट्राध्यक्षांकडून जब्बारना १९८१ साली पद्मश्री सन्मान मिळाला. दिलीप चित्रे यांनी पुढाकार घेतलेल्या मराठी चित्रपट महोत्सवांत अमेरिकेतील मुख्य शहरांत सात मराठी चित्रपट दाखवले गेले. त्यांत 'सिंहासन' व 'उंबरठा' यांचा अंतर्भाव असल्याने जब्बार पटेल त्या वेळीं अमेरिकेंत आले होते. वीस वर्षांच्या दीर्घ नियोजनानंतर सन २००४ मध्ये मुंबईतील पु.ल. देशपांडे कला अकादमीचे ते पहिले संचालक नेमले गेले. इमारतीच्या पहिल्या आराखड्यापासून ते संगीत, नृत्य, नाटक, चित्रपट इत्यादी कलांसाठी या केंद्रात कोणकोणते उपक्रम राबवण्यात यावे येथपर्यंत जब्बारनी रूपरेषा आखून दिली. भारतांतील सर्व राज्यांमधील कलाकृती या संस्थेंत यायला हव्या, तसेच भारुडापासून लावणीपर्यंत कलांवर तेथे माहिती उपलब्ध असावी असा त्यांचा आग्रह आहे. ती वास्तू आंतरराष्ट्रीय दर्जाची सांस्कृतिक संस्था व्हावी हे जब्बार पटेलांचे स्वप्न वास्तवांत यायला निरनिराळ्या कलाक्षेत्रातील व्यक्तींचे आणि संस्थांचे सहकार्य आवश्यक आहे. जब्बार संगीत नाटक अकादमी, राष्ट्रीय नाट्यशाला आणि फिल्म व टेलिव्हिजन इंन्स्टिट्यूट या संस्थांच्या संचालक मंडळांवरहि आहेत.

नाट्य, चित्रपट आणि सांस्कृतिक क्षेत्रांत गेली चाळीसएक वर्षे जब्बार पटेल फार प्रचंड कामगिरी करून राहिले आहेत. पण सुरुवातीला म्हंटल्याप्रमाणे त्यांच्याशी बोलतांना त्यांचे मोठेपण तुम्हाला जाणवणारदेखील नाही. मात्र स्वत:च्या नवीन कल्पना, इतरांचे उल्लेखनिय चित्रपट, नवीन नाटके, तसेंच अनेक विषयावरील पुस्तके इत्यादी गोष्टींवर मात्र ते भरभरून बोलतील. त्यांना भेटून बाहेर पडल्यावर तुम्हाला त्यांच्या उंचीची एकदम जाणीव होईल आणि ते 'आपले' आहेत याचा सार्थ अभिमानहि वाटेल.

-श्रीनिवास माटे
***smate@sbcglobal.net***

## पूर्वीच्या अधिवेशनातील उपस्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| १९८४ | शिकागो – २५० | १९९५ | ह्यूस्टन – २२०० |
| १९८५ | टोरांटो – ६५० | १९९७ | बॉस्टन – ३५०० |
| १९८७ | न्यू जर्सी – २२०० | १९९९ | कॅलगरी – १८०० |
| १९८९ | डेट्रॉईट – १८०० | २००१ | सॅन होजे – ३००० |
| १९९१ | लॉस एंजेलिस – २००० | २००३ | न्यू यॉर्क – २००० |
| १९९३ | वॉशिंग्टन – ५५०० | २००५ | ॲटलांटा – २५०० |

## सिॲटल अधिवेशनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा

**गुरूवार २८ जून २००७**

*सकाळी ९ ते ४ उद्योजक व वैद्यकीय व्यावसायिकांचे संमेलन (स्वतंत्र नोंदणी आवश्यक)*
*संध्याकाळी ६ ते ८ खास भोजन समारंभ (स्वतंत्र नोंदणी आवश्यक)*

**शुक्रवार २९ जून २००७**

*सकाळी ८.३० ते ९.०० स्वागत*
*सकाळी ९.०० ते १०.०० प्रमुख पाहुणे डॉ. जब्बार पटेल यांचे भाषण*
*सकाळी १०.०० ते १२.०० उद्घाटन समारंभ - सादरकर्ते सिॲटल, सॅन होजे व शिकागो मंडळाचे कलाकार*
*दुपारी १२.०० ते २.०० भोजन*
*दुपारी २.०० ते ३.०० बृ. मंडळ आयोजित स्पर्धेतील विजेती एकांकिका*
*दुपारी ३.१५ ते ४.४५ मधुर भांडारकर यांची मुलाखत सुधीर गाडगीळ घेतील.*
*संध्याकाळी ६ ते ८ भोजन*
*रात्री ८ ते ११ 'मम आत्मा गमला' - मराठी सुगम संगीताचा कार्यक्रम - आशा खाडिलकर, रविंद्र साठे, सुरेश बापट, नीलाक्षी पेंढारकर, सचिन व सुप्रिया पिळगांवकर, साथ - उत्तर अमेरिकेतील कलाकार*

**शनिवार ३० जून २००७**

*सकाळी ९ ते १० प्रमुख वक्ते डॉ. नरेंद्र जाधव यांचे भाषण*
*सकाळी १० ते १०.३० बृ. मंडळ सन्मान समारंभ*
*सकाळी १०.३० ते १२ युवा मंडळ कार्यक्रम - थिऑट्रिक्स, न्यू जर्सी*
*दुपारी १२ ते २ भोजन*
*दुपारी २.०० ते ३.३० स्त्री रंग - विजया राजाध्यक्ष (लेखिका), झेलम परांजपे (नर्तिका), अश्विनी भिडे (गायिका)*
*दुपारी ४.०० ते ५.०० बृ. मंडळ आयोजित स्पर्धेतील विजेती एकांकिका*
*दुपारी ५.०० ते ६.०० उस्ताद झाकीर हुसेन - तबला वादन*
*संध्याकाळी ६ ते ८ भोजन*
*रात्री ८ ते ११ नाटक - पाऊल कुणाचे वाजले -दिग्दर्शक विजय केंकरे भूमिका - अशोक व निवेदिता सराफ*

**रविवार १ जुलै २००७**

*सकाळी ९ ते १०.०० बृ. मंडळाच्या नविन कार्यकारिणीची ओळख*
*सकाळी १०.०० ते ११.३० सूर पश्चिमेचे - उत्तर अमेरिकेतील कवि, व संगीतकार यांच्या रचनांचा दृकश्राव्य कार्यक्रम, सादरकर्ते उत्तर अमेरिकेतील कलाकार*

**(नोंदणी अर्ज http://www.bmm2007seattle.org/)**

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**Alaska cruise & tour group leaving for 7 nights before & after BMM Convention**
**SOTC tours/Cox & Kings to Europe**
**eMail: comforttrvl@netscape.net or comforttrvl@yahoo.com**
**Please call - SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**
**FAX: 732-767-3138**

# काहीतरी वेगळे

## सुनील नारकर टीव्ही मालिकेत

संजय मालकर पाठोपाठ दुसरा भारतीय चेहरा १८ मे पासून



दर आठवड्यास आता टीव्हीवर दिसणार आहे व तो सुद्धा एक मराठी चेहेरा. ABC TV वर दर शुक्रवारी रात्री ९ ते १० National Bingo Night ही मालिका नविन मालिका सुरू होत असून लॉस एंजेलिसचे सुनील नारकर या मालिकेचे co-host आहेत. प्रेक्षक दर शुक्रवारी मालिका सुरू होंण्याअगोदर www.abc.com या वेबसाईटवर जाऊन एक बिंगो कार्ड छापू शकतील व टीव्हीवर होणाऱ्या ३ बिंगो गेममधे सामील होऊन बक्षिसे जिंकू शकतील. Extreme Makeover – Home edition गाजलेल्या मालिकेवरील Ed Sanders या मालिकेचा प्रमुख Host आहे. ही मालिका स्पॅनिश चॅनेलवरसुद्धा दाखवणार आहेत.

सुनील नारकर यांनी 'नाटक' ही संस्था लॉस एंजेलिसमध्ये स्थापन करून आता बरीच वर्षे झाली. या पूर्वी वॉल मार्ट, चेस क्रेडिट कार्ड, बटरफिंगर, जॉनी वॉकर व्हिस्की या जाहीरातीमधे त्यांचा भाग होता



या मालिकेत 'कमिशनर सुनील' या नावाने त्यांना संबोधले जाईल.

## नविन चित्रपट Blind Dating

इंग्लंडमध्ये वास्तव्य करणारी अंजली जय हिचा पहिला चित्रपट Blind Dating ११ मे पासून अमेरिकेतील काही चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. अंजली ही मूळची बंगलोरची. तिच्या आई-वडिलां



एका प्रसंगात खिस पेन्स व अंजली जय

बरोबर इंग्लंडला आली. लहानपणापासून तिला नाटकात काम करायची आवड. नुकतेच रॉयल शेक्सपिअर कंपनीच्या सलमान रशदी यांनी लिहिलेल्या Midnight's Children या नाटकात तिने काम केले होते. सध्या BBC Televisionवर चालू असलेल्या Robin Hood या १३ भागाच्या मालिकेत ती काम करीत आहे. Blind Dating या चित्रपटात तिच्याबरोबर Chris Pence, Sendhi Ramamurthy ('Heroes' fame) हे नट आहेत. एका आंधळ्या अमेरिकन तरूणाला खरे प्रेम कसे सापडते हे विनोदी पद्धतीने या चित्रपटात दाखवले आहे. या चित्रपटाचा ट्रेलर www.apple.com/trailers/independent/blinddating/trailer अथवा www.blinddatingthemovie.com येथे पहा.

## पूर्वीच्या अधिवेशनातील करमणुकीचे कार्यक्रम

| | |
|---|---|
| १९८४ | शिकागो – आनंद भाटे, (भारत) – नाट्यसंगीत |
| १९८५ | टोरांटो – उत्तर अमेरिकेतील कलाकार (अरूण दाते येऊ शकले नाहीत) |
| १९८७ | न्यू जर्सी – स्थानिक कलाकार – मृदगंध – दिग्दर्शक अशोक कामेरकर, फिलाडेलफिया |
| १९८९ | डेट्रॉईट – स्थानिक कलाकार – सादरकर्ते – लतिका व रमेश मंगरूळकर, डेट्रॉईट |
| १९९१ | लॉस एंजेलिस – सादरकर्ते – गोपाळ मराठे – शोभा आंबेगांवकर – अनुपमा दलाल – लॉस एंजेलिस |
| १९९३ | वॉशिंग्टन – आशा खाडिलकर, रजनी जोशी, मुंबई – नाट्यसंगीत, स्थानिक कलाकार – वाद्यवृंद |
| १९९५ | ह्यूस्टन – विद्याधर ओक – हार्मोनियम, क्षमा वैद्य – नाट्यसंगीत, स्थानिक कलाकार – मी विश्वाचा आहे – दिग्दर्शक – सुधीर मोघे |
| १९९७ | बॉस्टन – हृदयनाथ मंगेशकर – अमृताचा घनु |
| १९९९ | कॅलगरी – माणिक मोती – सादरकर्ते – अशोक हांडे |
| २००१ | सॅन होजे – आशा भोसले |
| २००३ | न्यू यॉर्क – श्रीधर फडके |
| २००५ | ॲटलांटा – सुरेश वाडकर, हृषिकेश रानडे, बेला शेंडे |

## पूर्वीच्या अधिवेशनातील नाटके

| | |
|---|---|
| १९८४ | शिकागो – वऱ्हाड निघालय लंडनला – लक्ष्मण देशपांडे |
| १९८५ | टोरांटो – सखे शेजारी – दिग्दर्शक – अशोक कामेरकर |
| १९८७ | न्यू जर्सी – अशी पांखरे येती – दिग्दर्शक – विजय प्रधान |
| १९८९ | डेट्रॉईट – छू मंतर– दिग्दर्शक – सुभाष केळकर |
| १९९१ | लॉस एंजेलिस – रायगडाला जेव्हां जाग येते – दिग्दर्शक – विजय तेलकीकर – सादरकर्ते – महाराष्ट्र मंडळ लॉस एंजेलिस |
| १९९३ | वॉशिंग्टन – सारजा – दिग्दर्शक – मधुसुदन जोशी |
| १९९५ | ह्यूस्टन – चूकभूल द्यावी घ्यावी – दिग्दर्शक – दिलिप प्रभावळकर |
| १९९७ | बॉस्टन – जाणता राजा – सादरकर्ते – बाबासाहेब पुरंदरे चार दिवस प्रेमाचे – सादरकर्ते – सुयोग, मुंबई |
| १९९९ | कॅलगरी – वाऱ्यावरची वरात – सादरकर्ते – कला – सॅन होजे – दिग्दर्शक – मुकुंद मराठे |
| २००१ | सॅन होजे – रणांगण – सादरकर्ते – चंद्रलेखा, मुंबई |
| २००३ | न्यू यॉर्क – सूर माझे सोबती – सादरकर्ते – कलाभवन – दिग्दर्शक – डॉ. मीना नेरूरकर |
| २००५ | ॲटलांटा – हम तो तेरे आषिक है – दिग्दर्शक – संजय मोने, मुंबई |

# अशोक हांडे यांचा मराठी बाणा

'मराठी नाटकांना वाईट दिवस आले आहेत ', 'प्रेक्षकांनी नाटकांकडे पाठ फिरवली आहे', 'पाहिलेच पाहिजे असे एकही नाटक अनेक वर्षात एखादेच असते', अशा प्रकारची विधाने अनेक लोक करीत असताना 'चौरंग ' संस्थचे अशोक हांडे लेखक, निर्माता, निवेदक अशा विविध भूमिकेत १०० टक्के मराठी गीते व नृत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम रंगभूमीवर आणतात व मराठी संस्कृतीची गुढी अभिमानाने व दिमाखाने उभी करतात. एरवी मराठी नाटकाचा बोर्ड लावताना व तिकिट विक्रीची सुरूवात करताना नाटक पैसे कमावणार का गमावणार याची भिती कंत्राटदारांना भेडसावत असते. परंतु अशोक हांडे यांच्या 'मराठी बाणा ' काय किंवा अन्य कलाकृती काय, त्याची तिकीट विक्री सुरू झाल्यावर काही तासातच 'हाऊस फुल्ल'चा बोर्ड लागतो याला अपवाद नाही. प्रेक्षकांना हवे ते समाधान देणारी कलाकृती असली तर मराठी प्रेक्षक ३०० रूपयांच्या तिकीटाबाबत अजिबात तक्रार करणार नाही. कारण तडजोड व काटकसर हे शब्द अशोक हांडे यांच्या डिक्शनरीतच नाही. त्यांच्या मते मायकल जॅकसन जर ११ कोटी डॉलर्स खर्च करून 'पॉप शो' करू शकतो तर अशोक हांडे ११ लाख रूपये खर्च करून 'मराठी बाणा 'ची निर्मिती का करू शकणार नाही?






'मराठी बाणा ' हे मराठी कलासंस्कृतीचे साद्यंत व सुंदर सादरीकरण आहे. भूतकाळात जमा होऊ पहात असलेल्या आपल्या मराठी संस्कृतीला तिच्यामधे सामावलेल्या कलाप्रकारांना उजाळा देण्याचा उपक्रम यात केला आहे. पडदा उघडताच नेत्रदीपक नेपथ्य नजरेत भरते. मधोमध मंदिराचा कळस, जुन्या पद्धतीची कौलारू घरे, आजुबाजूचा परिसर, झाडे असा देखावा तर कार्यक्रमात बैल, औत घेऊन शेतावर जाणारे शेतकरी, वासुदेवाचे स्वागत करणाऱ्या मराठमोळ्या सुवासिनी, तुळस डोक्यावर घेतलेले, भजन म्हणणारे, पालखी वाहणारे, भगवा झेंडा नाचवणारे वारकरी हे बघून मन हरकून जाते. कोळी नृत्य, खंडोबाचे भजन, गौरी गणपतीनंतर लगीनघाई, होळी नृत्य व लावणी नृत्य झाल्यावर 'शेजारी' या प्रभातच्या गाजलेल्या चित्रपटातील 'लखलख चंदेरी सोनेरी न्यारी दुनिया ' हे नृत्याविष्कारासह सादर होणारे गाणे दिवाळीचा आनंदोत्सव उत्तमपणे व्यक्त करते. भूपाळीपासून जेजुरीच्या खंडोबापर्यंत हा जागर विलक्षणपणे मन प्रफुल्लीत करणारा आहे. मोगलशाही, आदिलशाही यांचे आक्रमण व पानिपतावर चाल करणाऱ्या शूर मराठी सैनिकांची वीरश्री यांचे माहितीपूर्ण ओघवते निवेदन अशोक हांडे समर्थपणे करतात. 'मराठी पाऊल पडते पुढे' या गीताने कार्यक्रमाची सांगता होते तेव्हां अशोक हांडे नावाच्या गारूडयाने तीन तास भारावलेले प्रेक्षक पसंतीची दाद देत बाहेर पडतात.

'चौरंग ' या संस्थेतर्फे १९९७ मध्ये केलेल्या मराठी गीतांच्या कार्यक्रमाने (मंगलगाणी-दंगलगाणी) उपस्थितीचे आकडे मोडले व त्याचे ११०० पेक्षा अधिक प्रयोग झाले. त्यानंतर 'आवाजकी दुनिया ' व 'गाने सुहाने' या संगीत कार्यक्रमांना प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला व हाऊसफुल्लची पाटी तिकीटविक्रीच्या खिडकीवर लावली. २००१ साली कॅलगरी. कॅनडा येथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात प्रसिद्ध गायिका कै. माणिक वर्मा यांच्या जीवनावर आधारित 'माणिकमोती' हा कार्यक्रम सादर केला. तीन दिवस चाललेल्या अधिवेशनातील सर्वात उत्तम कार्यक्रम म्हणून तो गाजला.

अतिशय सुंदर, दर्जेदार व वैभवशाली मराठी संस्कृतीचे व इतिहासाचे दर्शन घडविणारा हा कार्यक्रम आहे. आजी-आजोबा, आई-वडिल, नातवंडे अशा तिन्ही पिढ्यांनी एकत्रितपणे पहावा व त्याचा आनंद लुटावा असा हा कार्यक्रम फक्त मनोरंजनाचाच नाही तर सांस्कृतिक दर्शन, आत्मचिंतन व प्रबोधन करावयास लावणारा आहे व म्हणून प्रत्येक मराठी माणसाने सहकुटुंब पहावा असा निश्चितच आहे.

**विद्याधर सहस्त्रबुद्धे,**
हॅरिसबर्ग, पेनसिलव्हेनिया



# आंब्याची निर्यात



हापूस आंबे अमेरिकेत येणार येणार असं गेलं वर्षभर गाजत आहे. नुकतीच वाजत गाजत बातमी आली की आंब्यांची पहिली बॅच न्यूयॉर्कला रवाना झाली. लॉस एन्जेलिसमध्ये आंबे येणार असल्याचे ऐकले. आम्ही खरेदीची नावनोंदणीही केली. या आंब्यांच्या निर्यातीसाठी काय काय करावे लगते याची माहिती वाचकांना देणारा हा लेख. राजसी वीरकर ही वीर या गावच्या आंबे व्यावसायिकाची मुलगी असून बी.ए. करता करता कृषि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेत आहे. उन्हाळयाच्या सुट्टीत ती वडिलांना आंबे काढण्यापासून मुंबईस पाठवण्यापर्यंतच्या सर्व कामात मदत करते.



आंब्याला फळांचा राजा म्हणतात ते काही उगीच नव्हे ! असतोच मुळी तो दिसायला देखणा आणि चवीला गोड. हापूसचा स्वाद म्हणजे अहाहा! पण पायरी आणि रायवळ आंबाही काही कमी नसतो. आंबा लागवडीत भारताचा क्रमांक सर्वात वर लागेल. कारण जगातल्या एकूण आंबा उत्पादनाच्या निम्मे उत्पादन भारतात होते. असे असूनही आंबा निर्यात करण्याच्या व्यवसायात मात्र भारताचा क्रमांक तिसरा आहे. भारतातून अनेक ताजी फळे निर्यात होतात. त्यात आंब्याचा वाटा फक्त १५ टक्के आहे.

आज मलेशिया, अतिपूर्वेकडचे देश, मध्यपूर्वेतले देश, नेदरलँड ब्रिटन अशा अनेक देशात आंब्याला आणि आंब्यापासून तया र होणाऱ्या पदार्थांना मागणी आहे. हापूस, तोतापुरी, केसर, केन्ट, टॉमिॲटकिन या जातीच्या आंब्यांना परदेशात विशेष मागणी आहे. परकीय चलन मिळवण्यास अजून भरपूर संधी आहे हे लक्षात आल्यावर गेल्या काही वर्षात आंबा निर्यातीस फार महत्त्व आले. नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड, स्टेट ॲग्रि-कल्चरल बोर्डस, आणि ॲग्रिकल्चर ॲन्ड फूड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथॉरिटीज (अपेडा)या संस्थांचा आंबा निर्यातीत महत्त्वाचा भाग असतो. अपेडाने तर वाढत्या मागणीचा विचार करून आंबानिर्यात क्षेत्राची स्थापना केली आहे.

महाराष्ट्रातील रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीभागातून आंबा निर्यात होतो. महाराष्ट्र स्टेट ॲग्रिकल्चर बोर्डाच्या पुढाकारामुळे मार्च १९९१ मध्येच "महामँगो" या नावाची संस्था स्थापन झाली. त्याचे मुख्य कार्यालय सिंधुदुर्ग तालुक्यातील कुडाळ येथे आहे. आंबा निर्यातदारांची सोय म्हणून आंब्याचे शीतकरण (रेफ्रिजरेशन), प्रतवारी करणे, आकर्षक पॅकिंग याची सोय महामँगो संस्थेत होते.

आंबानिर्यातीसाठी आंब्यांची प्रतवारी लावली जाते.
२५० ते ३०० ग्रॅम वजनाची फळे "अ" प्रतीची .
२२५ ते २५० ग्रॅम वजनाची फळे "ब" प्रतीची .
२०० ते २२५ ग्रॅम वजनाची फळे "क" प्रतीची .
निवड करतांना ८५टक्के तयार आंबे निवडावे लागतात. फळांचा आकार गोल, अंडाकृती असेल तर चांगले समजतात. कोणताही डाग नसलेला, इजा न झालेला, स्वच्छ आणि आकर्षक आंबा निवडावा लागतो.

काढणीपूर्वीचे व्यवस्थापनः
चांगल्या दर्जाचे आंबे तयार होण्यासाठी चांगले नियोजन आणि व्यवस्थापन लागतेः
१. फळांचा आकार वाढण्यासाठी योग्यवेळी व योग्य प्रमाणात जीए संप्रेरक फवारणे आवश्यक.
२. आंब्याला पाणी मिळणे महत्त्वाचे. त्याचेही प्रमाण बघावे
३. फळांचा आकार योग्य वाढण्यासाठी मोहोराची विरळणी करावी लागते.
४. कीटक नाशक आणि बुरशीनाशकाची फवारणी लागते. परंतु काढणीपूर्वी पंधरा दिवस कोणतेही कीटक अथवा बुरशी नाशक फवारायचे नसते.

आंब्याची काढणीः
१. आंब्याची काढणी करतांना फळे देठासह काढावी लागतात. म्हणजे फळावर चीक पसरून डाग पडत नाही. शिवाय देठासह काढलेली फळे दोन ते तीन दिवस जास्त टिकतात.
२. काढतांना प्रत्येक फळ स्वतंत्रपणे काढून काळजीपूर्वक हाताळावे लागते.
३. फळे ठेवण्यासाठी स्वच्छ प्लॅस्टिक टोपल्यांचा वापर करावा लागतो.
४. काढणी सकाळी अथवा संध्याकाळी म्हणजे तपमान कमी असतांना करावी लागते.
५. फळांची परिपक्वता फडताळून पहाण्याकरता हॅन्ड रिफ्रॅक्टोमीटरचा उपयोग करतात. विद्राव्य घटक ८ ते १० टक्के असणाऱ्या फळांची निवड निर्यातीसाठी करतात.
५. काढणीनंतर आंबे सावलीत ठेवावे लागतात.

पॅकिंगः

आंबा निर्यात करतांना पॅकिंग बद्दल प्रमाणके सांभाळावी लागतात. आकर्षक पेट्या अथवा खोकी वापरावी लागतात. एक डझन, अडिच किलो, पाच किलो अशा क्षमतेच्या पेट्यात पॅकिंग करावे लागते. युरोपसाठी २० बाय ४० बाय २० सेंमी आकाराची खोकी वापरतात. खेळत्या हवेसाठी ( वायुवीजन)जागा ठेवावी लागते. एका पेटीतील सर्व फळे एकाच आकाराची असली तर बरे ! पॅकिंग करण्यापूर्वी आंब्यावर कार्बेन्डॅझिमची प्रक्रिया करावी लागते. त्यामुळेफळे कुजत नाहीत. जरा डाग असेल तर ०.१टक्के ब्लीचिंग सोल्यूशन वापरून फळे धुवावी लागतात. खोक्यावर उत्पादकाचे नाव, पत्ता, पॅकिंगची तारीख, फळांची संख्या वजन, फळांची जात इ. तपशील असावा लागतो.

वाहतूकः

कमी तपमानात, म्हणजे शक्यतो रात्री वाहतूक केली जाते. शक्य तिथे शीतधारक ( कोल्ड कंटेनर) चा उपयोग करावा लागतो. प्रत्येक शेतकऱ्याने जर अशा काही शास्त्रोक्त पध्दतींचा वापर केला तर भारतातून आंब्यांची निर्यात वाढू शकेल.

**---राजसी र. वीरकर**

## DR MOHAN DURVE PRESENTS TOURS IN 2007

***Mongolia July 11-22, $3655**
***Tibet by rail  July 21-31, $3550**
China w/Yangtze River Cruise, Sept 17-Oct 1, $2799
***Mediterranean Cruise, Sept 20-Oct 1, $2169**
**(Rome, Genow, Monte Carlo, Valencia, Malta, Tunis)**
***Croatia October 15-25, $1649**
Egypt October 17-28, $2099
S. America (Rio, Iguassu Falls/Buenos Aires)Nov.5-16 $1749
Australia/New Zealand, November 6-21
***Polar Bear Safari/Northern Lights November 1-6, $3795**
Hawaii December 11-23, Cruise from $1954
*** Caribbean Cruise December 16-23, Balcony from $650**
**(San Juan,St.Thomas,Dominica,Barbados,St. Lucia, Antigua)**
Antarctica Dec.25–Jan 4,08 or Jan 13-23,2008 Cruise from $3999
Bombay CME, December 31,2007 $250

Call:  440-845-7272 or 888-794-1995
E-mail at:cmetravels@yahoo.com or mjdurve@sbcglobal.net.
All above prices are for Land Only, per person sharing a twin / double in US dollars. All departures are guaranteed. Gratuities, Visa Fees are extra.


## BMM Awards 2007 (contd. From page 1)

(d) The following factors will be taken into account in the selection process:

(i) Number of years of service
(ii) Educational background
(iii) Achievement record – publications, awards, etc.
(iv) Activity level – local, regional, national,
(v) Community involvement as social worker.

(e) The decision of the selection committee in concurrence with the BMM Executive Committee will be final and binding. Please send your nominations to the chairperson of the nomination committee before 15th June.

(f) The awards will be distributed during the forthcoming BMM convention. The award recipient has to receive the award in person at the convention unless the recipient has genuine reason not to be pre sent. If the recipient cannot attend the convention, then the distribution of the award may be postponed to the next convention.

Please send your nominations to the chairperson of the nomination committee before 15th June.
Name of the Chair: Dr. Suresh Bilolikar
Email Address: sgtroykar@gmail. com and/or sgtroykar@hotmail. com
Telephone Number: 1-248-641-7716
Two other members of the committee are:
Shyam Navathe (770) 416-8901 and/or 891-8901
navathe@yahoo. com
Vinayak Gokhale (416) 497-3546
vinayak.gokhale@ sympatico. ca>
We appreciate your continued support of BMM activities.

**Jagannath Wani, Member**
BMM Executive Committee

## एकांकिका स्पर्धा

१२ व १३ मे २००७ रोजी शिकागो येथे टॅलेंट ट्रान्सफर या उपक्रमांतर्गत एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. त्या विषयीः

स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी बृ. मंडळाने टॅलेंट ट्रान्सफर हा उपक्रम दोन वर्षापूर्वी सुरू केला. त्याचा एक भाग म्हणून उत्तर अमेरिकेतील कलाकारांची एकांकिका स्पर्धा घेऊन सिॲटल अधिवेशनात विजेत्या दोन एकांकिका मुख्य सभागृहात सादर कराव्या अशी कल्पना कार्यक्रम समितीने मांडली. ती सर्वांना पसंत पडली व सर्वजण कामाला लागले.

स्पर्धेसाठी पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व मध्य असे ५ विभाग पाडण्यात आले व प्रत्येक भागासाठी एक संयोजक नेमण्यात आला. कल्पना जोशी, मुकुंद मराठे, मिलिंद करंदीकर, विवेक भिडे व श्रीधर जोशी यांनी ही जबाबदारी उचलली. बृ. मंडळाच्या वतीने जगदीश वासुदेव, किरण जोगळेकर व आशिष चौगुले तर अधिवेशन समितीमार्फत रूपाली शेठ यांनी काम पाहिले.

प्रत्येक विभागात प्राथमिक स्पर्धा घेण्यात आली त्यातून दोन एकांकिकांची अंतिम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. निकाल निःपक्षपाती असावेत म्हणून विभागीय व अंतिम स्पर्धेत प्रत्येकी ३ परिक्षकांची निवड करण्यात आली. अनेक मंडळांनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. अंतिम स्पर्धेचा निकाल शेवटी दिला आहे.

अंतिम स्पर्धा भरविण्यास शिकागो मंडळाने खूप मेहेनत घेतली. सर्व स्पर्धकांना शिकागो मंडळाच्या वतीने एक भेट व बृ. मंडळ व सिॲटल अधिवेशन समिती यांच्या वतीने प्रशस्तीपत्रके भेट देण्यात आली. सर्व स्पर्धक स्वखर्चाने शिकागोला आले ही अत्यंत कौतुकाची बाब मानायला हवी आणि त्यामुळे ही स्पर्धा यशस्वी होऊ शकली.

कोणतीही स्पर्धा प्रत्येकाला मूळचे गुण वाढविण्यास पोषक ठरते. त्यात ईर्षेची भर पडली आणि स्पर्धा असून मैत्रीचे, खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले नाही तर तो एक वेगळा अनुभव ठरतो. या स्पर्धेमुळे विविध ठिकाणचे कलाकार जवळ आले असा आयोजकांना विश्वास वाटतो.

गेले वर्षभर ही स्पर्धा आयोजित करताना खूप सुखद अनुभव आले, नव्या ओळखी झाल्या. स्पर्धा संपली म्हणून काही दिवस चुकल्यासारखे वाटले तरी हा उपक्रम यापुढेही चालू रहाणार आहे या कल्पनेनी सर्वांमध्ये परत उत्साह निर्माण झाला. यापुढेही अशा स्पर्धांना असाच किंवा अधिक प्रतिसाद मिळेल हीच अपेक्षा.

**रूपाली शेठ** ***reachrupali@gmail.com***

### एकांकिका स्पर्धा - अंतिम विजेते

**प्रथम क्रमांक - मनोमिलन** - सादरकर्ते - थिॲट्रिक्स, न्यू जर्सी लेखक - किरण यज्ञोपवित - दिग्दर्शक - विदुला मुणगेकर
**द्वितीय क्रमांक - साठेचं काय करायचं?-** सादरकर्ते - कला - सॅन होजे, लेखक - राजीव नाईक - दिग्दर्शक - आनंद घाणेकर
उत्कृष्ठ दिग्दर्शक - विदुला मुणगेकर
उत्कृष्ठ अभिनेता - अशुतोष हडप - मनोमिलन
उत्कृष्ठ अभिनेत्री - रसिका जोशी - नवरा विकणे आहे - फ्लोरिडा
अभिनेत्री पल्लवी रानडे ( थिएटर ॲकॅडमी, चित्रपट लपंडाव), अलंकार जोशी (पूर्वीचा बाल सिने कलाकार मास्टरअलंकार, शोले व इतर ५० चित्रपट ) व डॉ. मोहन आगाशे हे परिक्षक होते.
सर्व विजेत्यांचे अभिनंदन.

# Prakash and Manda Amte at BMM 2007 in Seattle





Deep in the heartland of India in an isolated tribal village called Hemalkasa, a couple has been quietly performing miracles every day, for almost three decades to improve living conditions of the local tribes. What they have accomplished in this period is mind-boggling Quiet and unassuming couple, Prakash and Manda, provide medical care to more than 40,000 tribal people [adivasis] every year, as well as education to hundreds of their kids, some of whom have become medical doctors, engineers, lawyers, veterinarians and professionals in variety of disciplines. Wild life orphanage is another important activity of theirs. Few years ago, Prakash received the title of "Padmashree" from the Government of India for his exemplary service to the Madia tribes and the orphaned wild life in the region. Prakash and Manda Amte are among the very few Indians honored with a postal stamp by any foreign country, such as the Principality of Monaco.

Many youth from all over the world have traveled to Hemalkasa to work with Prakash Amte. Particularly, medical students derive lots of benefit from such volunteering. They get to see many kinds of diseases unheard of in the Western world. On an average, more than 200 patients come for OPD every day. Very recently, Meghan Desale, one of the Truman Scholars of this year from San Jose, and Chanda Athley from Washington, DC, volunteered during the annual surgery camp in Hemalkasa, where more than 200 surgeries were performed. For Meghan and Chanda, it was an experience of their life. They will participate along with Prakash and Manda in the presentation and narrate their experience. YOUTH DELEGATE AT THE CONVENTION WILL ENJOY THIS PROGRAM. IT WILL BE CONDUCTED IN ENGLISH FOR THE BENEFIT OF THE YOUTH.

Namaskar!

A few years back I read the book "Negal" by Vilas Manohar. I was very fascinated by the fact that Drs. Prakash and Manda Amte have power to heal and deal with these wild beasts and most of all to gain their love, trust and confidence. I thought that it would be really interesting to read more about this, and even better, if I ever get a chance to listen to them in person.

Unexpectedly, in the summer of 2003, Marathi Bhashik Mandal of Toronto had arranged an evening get together with Drs. Prakash and Manda Amte. It was a dream-come-true for me! I was extremely excited to see these Living Gods.

During the get together I got introduced to their real work at Hemalkasa. That introduction was even more amazing than the book "Negal." My husband Nitin and I thoroughly enjoyed the evening. We came home with a bigger heart and mind. That was a very different learning experience of understanding LIFE. We both found ourselves very insignificant in front of what we had just seen. We wanted to be able to at least make some people aware of this culture and do something little for this cause as our share. I bought the VCD: *Divine Messengers* to share with my friends.

Geeta Padhye

## पुढील महिन्यातील बृ. वृत्तात

- *अधिवेशनाचा सविस्तर कार्यक्रम*
- *व्यक्ति परिचय*
- *पुस्तक परिचय*
- *आणि नेहमीची सदरे*

## वृत्ताच्या वर्गणीचे व जाहिरातीचे नविन दर

*पोस्टाचे दर या महिन्यापासून वाढल्याने वृत्ताच्या वार्षिक वर्गणीत नाईलाजाने वाढ करावी लागत आहे. मात्र दोन वर्षाच्या व आजीव वर्गणीत वाढ केली नाही. त्याचा वाचकांनी फ़ायदा घ्यावा ही विनंती. नविन दर खालील प्रमाणे*

वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक | $21 | $31 | $41 |
| द्वैवार्षिक | $40 | $60 | $80 |
| आजीव | $250 | $375 | $375 |

जाहिरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान | $155 | $220 |
| अर्धे पान | $85 | $115 |
| पाव पान | $50 | $70 |
| अष्टमांश पान | $35 | $45 |

## पूर्वीच्या अधिवेशनातील कार्यक्रमांच्या डीव्हीडी ॲटलांटा

*डॉ. माशेळकर यांचे भाषण - १० डॉलर्स*

*उद्घाटनाचा कार्यक्रम - १२ डॉलर्स*

*वेस्टर्न घाटस - १२ डॉलर्स*

*हृषिकेश रानडे, बेला शेंडे - सुगम संगीत - १२ डॉलर्स*

*शिपिंग ३.५० डॉलर्स*

*ऑर्डर करण्यास १-८००-३००-६४३० फोन करा*

# शेवटचे पान

बृ. मंडळाने निर्मिलेल्या सीडी, डीव्हीडी अथवा पुस्तकातील सर्वाधिक खपाचे 'मॉमस किचन' या पाककृतीच्या पुस्तकाची तिसरी आवृत्ती काढण्याचे काम मला नुकतेच देण्यात आले म्हणून त्याची जुळवाजुळव मी करू लागलो. गेली १० वर्षे या पुस्तकाची ऑर्डर आली की ती पुरी करण्याचे काम मी करीत आहे. परंतु पुस्तक पाकक्रियेचे असल्याने त्याकडे इतक्या सूक्ष्म द्रुष्टीने मी यापूर्वी कधी पाहिले नव्हते. तिसऱ्या आवृत्तीसाठी पुस्तकाची फेररचना करावी म्हणून त्यातील मजकुराकडे लक्ष देणे भाग पडले. उत्तर अमेरिकेतील असंख्य महिलांनी प्रत्येकीच्या आवडत्या पाककृती त्यावेळी या पुस्तकासाठी लिहिल्या होत्या. आता त्या वाचताना प्रत्येक महिलेने अत्यंत जिव्हाळ्याने या पाककृती लिहिल्या आहेत हे जाणवत होते. अशा रितीने या सर्व महिलांचे अनुभव एकत्र झाल्याने हे पुस्तक इतर पाकक्रियांच्या पुस्तकापेक्षा भावी पिढीच्या द्रुष्टीने वेगळे व त्यामुळे अधिक लोकप्रिय झाले.

यशस्वी नेता भविष्याचा सतत वेध घेत असतो. बृ. मंडळाचे माजी अध्यक्ष कै. हणुमंतराव देशमुख हे एक असे नेते होते. मराठी खाद्यपदार्थांबद्दल ते अत्यंत हौशी व चोखंदळ होते. आपली पत्नी मधुमती पाककला निपुण आहे याचा त्यांना खूप अभिमान होता. वेगेवेगळ्या सणांना अगदी खास मराठी पदार्थ बनवून शिकागोतील मित्रांना खाऊ घालण्याची त्यांना खूप हौस. आपल्या आवडीचा व पत्नीच्या गुणांचा सर्वांना, विशेषतः पुढच्या पिढीला, फायदा व्हावा या विचाराने हणुमंतरावांनी 'मॉमस किचन' या पुस्तकाची कल्पना इतर मंडळांपुढे मांडली. "महाराष्ट्रात श्रीमती ओगले यांचे पाकक्रियेचे पुस्तक अगोदरच लोकप्रिय असताना हे पुस्तक कशाला", "अमेरिकेत इतर पाकक्रियेची पुस्तके कमी आहेत का?" अशा प्रकारची टीका हणुमंतरावांना त्यावेळी ऐकायला लागली होती. तरिही त्यांनी नेटाने त्यांच्या कल्पनेचा पाठपुरावा केला व १९९७च्या बॉस्ट्न अधिवेशनात 'मॉमस किचन' प्रकाशित केले. पुस्तक अर्थातच अत्यंत लोकप्रिय झाले व २००२ साली त्याची दुसरी आवृत्ती काढ़ावी लागली. नविन पिढीला भारतीय स्वयंपाक करायला आवडेल परंतु अमेरिकेतील दुकानात मिळणाऱ्या वस्तुंचा वापर करून 'चवीपुरते मीठ' अशी नविन पिढीला अगम्य असणारी भाषा न वापरता पाकक्रियेचे पुस्तक निघाले तर त्याचे स्वागत होईल हे हणुमंतरावांना नविन पिढीशी संवाद केल्याने कळले.

बृ. मंडळाची स्थापना व त्यानंतर अधिवेशन भरविण्याच्या कल्पनेला सुद्धा सुरवातीला असाच विरोध होता. " ही अधिवेशने भरवून तुम्हाला काय मिळणार?", "असे किती लोक अधिवेशनाला येतील?" अशा प्रकारचे प्रश्न त्यावेळी विचारले गेले (आजही जातात). कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले व जयश्री हुपरीकर या त्रयीने टीकेला न जुमानता बृ. मंडळाची स्थापना केली व शिकागोत पहिले अधिवेशन भरविले. मंडळाची कल्पना रूजेपर्यंत काम चालू ठेवले व त्याची भरभराट होताच योग्य व्यक्तींवर त्याची जबाबदारी सोपवली. १९८१ साली ही कल्पना इतरांना अगदी कमी मोलाची वाटली असेल. पण आता मागे वळून पाहताना त्याच कल्पनेला विशाल स्वरूप प्राप्त झाले . आहे एवढेच नव्हे तर अमेरिकेतील व आता युरोपातील मराठी समाजाने सुद्धा ती कल्पना उचलून धरून त्याचे अनुकरण केले आहे.

प्रत्येक गोष्टीची सुरूवात नेहमीच लहान असते. मग ती संस्था असो अथवा एखादा उद्योग. त्याची उदाहरणे आपण नेहमी बघत असतो. लोकमान्य टिळकांनी चालू केलेला गणेशोत्सव, पुण्याचा सवाई गंधर्व महोत्सव, किर्लोस्कर कारखाना, अथवा अमेरिकेतील उदाहरण द्यायचे तर 'होम डेपो' सारखी दुकाने, 'स्टार बक्स' सारखी कॉफी शॉप्स, या सर्वांची सुरूवात लहान प्रमाणातच झाली. सगळ्याच लहान कल्पना महान होतातच असेही नाही तरिही तिचा नेटाने पाठपुरावा केला तर सहसा अपयश येत नाही असेच इतिहास दर्शवितो.

भारतीय वंशाचे अमेरिकेतील प्रसिद्ध सल्लागार श्री. रामचरण यांचे भारतीय हॉटेल व्यावसायिकांच्या अधिवेशनात नुकतेच भाषण झाले. तेव्हां असेच विचार त्यांनी मांडले. "सतत भविष्याचा विचार करा, पण वर्तमानाचे भान राखा. नविन प्रॉडक्ट काढा ज्यायोगे आपोआप नविन उद्योग तयार होईल. यशस्वी उद्योगपती नेहमी क्षितिजाकडे लक्ष ठेवून असतो व नव्या संधी शोधत राहतो"

प्रसिद्ध अर्थतज्ञ वॉरेन बफे याची बर्कशायर हाथवे ही कंपनी प्रसिद्ध आहे. प्रथेप्रमाणे त्या कंपनीच्या भागधारकांची दरवर्षी ओमाहा, नेबरास्का येथे बैठक असते व ती एका स्टेडियममधे भरते ज्यायोगे इच्छा असलेल्या प्रत्येकाला हजर रहाता यावे. अमेरिकेतील अग्रगण्य उद्योजक त्याला मुद्दाम हजर राहतात. अमेरिकन अर्थव्यवस्था कुठे चालली आहे व उद्योगांचे भविष्य काय यावर चर्चा होते. या बैठकीच्या निमित्ताने अमेरिकेतील अनेक कंपन्यांचे चेअरमन एकत्र येतात. विचारांची, नविन कल्पनांची देवघेव होते. अमेरिकेतील अनेक यशस्वी उद्योगांचे मूळ अशा छोट्या भेटीगाठीत दडलेले आहे.

म्हणूनच बृ. मंडळाच्या अधिवेशनात उपस्थितांची करमणूक करण्याबरोबरच विचारांच्या देवाणघेवाणीला महत्त्व देणे अत्यंत जरूरीचे आहे. त्यातूनच नविन विचार उमलतील व भविष्यातील मार्गक्रमणा सुलभ होईल. आपल्या समाजाचे प्रश्न काय हेच जर कळले नाही तर प्रश्नांची उत्तरे कशी मिळणार?

अमेरिकन अंतराळवीराने चंद्रावर पहिले पाऊल टाकले तेव्हां 'हे मानवाचे पहिले छोटे पाऊल' असे उद्‌गार त्याने काढले. त्या मोहिमेनंतर अंतराळ विज्ञानात खूप प्रगती झाली. आपणसुद्धा दरवेळी "त्याने काय होणार?" अशी नकारात्मक भूमिका न घेता संधी सापडेल तेव्हां छोटी छोटी पाऊले धैर्याने टाकत राहिलो तर एक बलवान संघटित मराठी समाज निर्माण करू शकू असा मला विश्वास वाटतो.

**- मोहन रानडे**

***editorbmm@yahoo.com***

बृहन्महाराष्ट्र वृत्त

जाहीरातीसाठी उत्तम माध्यम, माफक दर

बृहन्महाराष्ट्र वृत्त


Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*



**INSURANCE & REAL ESTATE**

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: sjthakur@bellsouth.net

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com